# <u>प्रेसनोट</u>

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांना **A.C.B.** नागपूर पथकाने ३००००/- रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडले

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे नोंदणीकृत कंत्राटदार असून महाराष्ट्र शासनाची कामे करतात. तक्रारदार यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत शासकीय काम करण्याबाबतच्या परवान्याचे नुतनीकरणाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय नागपूर येथे ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला होता. तसेच अर्जासह संबंधित कागदपत्रांचा संच व्यक्तीशः महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर येथे सादर केला होता. सदर परवान्याचे नुतनीकरणाकरिता श्री सुभाष बबन भुजबळ, (**Class 1 Officer**) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय नागपूर यांनी ३०,०००/-रू. लाचेची मागणी केल्याची तक्रार यातील तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर कार्यालय येथे केली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी लाचेची मागणीबाबत पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक श्री सुभाष बबन भुजबळ, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय नागपूर यांनी तक्रारदार यांचे परवान्याचे नुतनीकरण करण्याकरिता तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रू. लाचेची मागणी करून स्वतः स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आज दिनांक १०/०६/२०२६ रोजी सापळा कारवाईवेळी आरोपी लोकसेवक श्री सुभाष बबन भुजबळ, मुख्य अभियंता यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय नागपूर येथील त्यांचे दालनात तक्रारदार यांचेकडून ३०,०००/-रू. लाच स्वतः स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपी लोकसेवक श्री सुभाष बबन भुजबळ यांचेविरूध्द पोलीस स्टेशन सदर नागपूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्रीमती भारती गुरनुले यांचे पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र वैरागडे, मपोहवा अस्मिता मेश्राम, करूणा सहारे, गिता चौधरी, पोहवा आशिष वैद्य, पोशि प्रफुल भातुलकर, होमेश्वर वाईलकर, स्वाती हिडोरिया आणि वाहन चालक राजेंद्र जांभुळकर यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

### <u>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा</u>

**१.** पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
**२.** टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअॅप क्र. ९०६७६७१०६४
**३.** डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
**४.** श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
**५.** श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
**६.** श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०